# भिवंडी निजापमपूर शहर महानगरपालिका भिवंडी

## पर्यावरण विभाग

## प्रसिध्दीसाठी

भिवंडी निजामपूर शहर महानगर पालिका कार्यक्षेत्रात शांतता क्षेत्र घोषित करण्यासाठी ध्वनीप्रदुषण (नियंत्रण व नियमन) नियम २००० मधील तरतुदी तसेच शासन निर्णय पर्यावरण विभाग क्र.ध्वनी प्र.२००९/ प्र.क्र.९५/ता.क-१ दि.२१ एप्रिल २००९ अन्वये भिवंडी शहरातील रुग्णालये,शैक्षणिक संस्था व न्यायालयाच्या सभोवतालचे कमीत कमी १०० मीटर पर्यंतचे क्षेत्र हा निकष लावून खालील नमुद केलेले एकुण १६ ठिकाणी शांतता क्षेत्र घोषित करण्यात आली आहेत.सदर क्षेत्र सुचनापत्र दि.२५/मार्च २०१० अन्वये निश्चित करण्यात आले असून मा.महासभा ठराव क्र.४४ दि.२९/०९/२०१५ अन्वये मंजूरी देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | प्रभाग समिती क्र. | ठिकाणाचे नाव | ठिकाणाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग समिती क्र.१ | भिवंडी दिवाणी व फौजदारी न्यायालय आग्रारोड लगत | न्यायालय |
| २ | प्रभाग समिती क्र.१ | स्व. इंदिरा गांधी स्मृती रुग्णालय | शासकिय रुग्णालय |
| ३ | प्रभाग समिती क्र.१ | मनपा शाळा क्र.४६ चांविद्रा रोड पाण्याच्या टाकी जवळ | महापालिका शाळा |
| ४ | प्रभाग समिती क्र.१ | ममता हॉस्पीटल,मिल्लतनगर | खाजगी रुग्णालय |
| ५ | प्रभाग समिती क्र.२ | एस.एन.डी.टी. कॉलेज कल्याणरोड | खाजगी कॉलेज |
| ६ | प्रभाग समिती क्र.२ | शाळा क्र.४५ पोलिस लाईन | महापालिका शाळा |
| ७ | प्रभाग समिती क्र.२ | आय.टी.आय.भादवड | शासकिय तंत्रनिकेतन |
| ८ | प्रभाग समिती क्र.३ | प.अ.जाधव शाळा धामणकरनाका | खाजगी शाळा |
| ९ | प्रभाग समिती क्र.३ | शेठ जुगीलाल पोद्दार शाळा धामणकरनाका | खाजगी शाळा |
| १० | प्रभाग समिती क्र.३ | बी.एन.एन. कॉलेज धामणकरनाका | खाजगी कॉलेज |
| ११ | प्रभाग समिती क्र.३ | पी.टी.हायस्कुल शाळा फेणे | खाजगी शाळा |
| १२ | प्रभाग समिती क्र.३ | ओसवाल शाळा,ओसवाल अंजूरफाटा | खाजगी शाळा |
| १३ | प्रभाग समिती क्र.३ | कान्हा चौधरी शाळा,भाग्यानगर,कामतधर | खाजगी शाळा |
| १४ | प्रभाग समिती क्र.४ | कै.जयराम सखाराम टावरे शाळा,नारपोली, दुधबावडी | खाजगी शाळा |
| १५ | प्रभाग समिती क्र.४ | गुरुकृपा रुग्णालय,नारपोलीख्पोलिस चौकी जवळ आग्रारोड | खाजगी रुग्णालय |
| १६ | प्रभाग समिती क्र.५ | निजामपूर पिली स्कुल | खाजगी शाळा |

वर नमुद ठिकाणी "शांतता क्षेत्र" असे लिहिलेले फलक लावले असून त्या फलकाच्या दरम्यानचा १०० मी.चा परिसर हा शांतताक्षेत्र म्हणून समजण्यात येईल.सर्व नागरीकांना व वाहन चालकांना असे आवाहन करण्यात येते की वर नमुद शांतताक्षेत्रामध्ये

वाहनांचा,हॉर्नचा,लाऊड स्पिकरचा वाद्यांचा किंवा इतर कोणत्याही प्रकारे दिवसा ५० डेसिबल्स व रात्री ४० डेसिबल्स पेक्षा जास्त आवाज करणार नाहीत.आवाजाची पातळी आवाजाच्या उक्त मानकापेक्षा १० डेसिबल्स किंवा अधिक वाढली असेल तर कोणत्याही व्यक्तीला प्राधिकरणाकडे तक्रार दाखल करता येईल. दिवस म्हणजे सकाळी ६.०० वाजल्या पासून रात्री १०.०० वाजे पर्यंत.रात्री म्हणजे रात्री १०.०० वाजल्यापासून सकाळी ६.०० वाजे पर्यंत असे समजण्यात येईल.

तरी नागरीकांनी याबाबत योग्य ती खबरदारी घ्यावी.

(एस.आर.निकम)

**नियंत्रण अधिकारी तथा**

**शहर अभियंता (प्र)**

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**